॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

कर्म हीच पूजा आहे, आणि
प्रामाणिकपणा हीच खरी स्पिरिट आहे.

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### पैशाचा बाजार

पक्षच झाले लई
पुढारी झाले सतरा
राजकारण झालं वंगाळ
थोडं समजून घे मित्रा

तत्व वगैरे काही नाही
उरली मतलबाची नदी
पैशाचा बाजार उधळून
कोण सत्ता मिळवत आधी?

# पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवास अवघ्या २ तासात!

**केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा**

**● पुणे । वीरभूमी–**

पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण व्हावा, हे माझे स्वप्न असून त्यासाठी शानदार महामार्ग विकसित केला जात आहे, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. या सहापदरी महामार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि तिथून पुढे नागपूरपर्यंतचा प्रवास अत्यंत जलद आणि सुलभ होणार असून त्यासाठी विमानाची गरज नसेल, असेही गडकरी म्हणाले.



यासोबतच मुंबई ते बंगळुरू हा प्रवास ५ तासात होणार आहे. त्यामुळे या मार्गावरून जलद प्रवास अधिक सुलभ होणार आहे. त्या पद्धतीचे रस्ते तयार करण्यात येत आहेत, असेही गडकरी यांनी सांगितले. पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. पुण्यात सध्या वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर मात करण्यासाठी येत्या दोन वर्षांत पुणे आणि आसपासच्या परिसरासाठी तब्बल ६० हजार कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांची कामे केली जाणार आहेत. यामध्ये ३१ हजार ६०० कोटी रुपयांच्या शिरूर ते पुणे प्रकल्पाचाही समावेश आहे.

गडकरी यांनी पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती दिली. हडपसर-यावत मार्गासाठी ५,२६५ कोटी रुपये, तळेगाव-चाकण-शिक्रापूर या ५३ किमीच्या टप्प्यासाठी ४ हजार कोटी रुपये तर शिरूर ते संभाजीनगर १९२ किमी मार्गासाठी १५ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले. याशिवाय खेड ते नाशिक फाटा ३० किमीसाठी ८ हजार कोटी, रावेत ते न-हे ६ हजार कोटी आणि पुणे ते सोलापूर मार्गासाठी ८ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला.

रस्ते जाळ्याच्या विस्ताराबाबत बोलताना गडकरी म्हणाले की, अटल सेतू ते पागोटे चौक आणि तिथून पुढे पुण्यापर्यंत एक नवीन रस्ता विकसित केला जात आहे. या मार्गावरून पुढे बंगळुरूपर्यंत अवघ्या ५ तासांत पोहोचता येईल, अशी व्यवस्था उभारली जात आहे. तसेच शिळफाटा ते पनवेल आणि जुन्या पुणे-मुंबई हायवेच्या सुधारणेवर लक्ष केंद्रित करण्यात आले असून त्यासाठी ६० हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

### इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान

■ इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणि एआयच्या वापराचा पुनरुच्चार गडकरींनी केला. सॅटेलाईटशी थेट जोडलेली वाहने रस्त्यांमधील त्रुटी आणि डिफेक्ट त्वरित शोधून काढतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पूर्वी मुंबई-पुणे प्रवासासाठी ६ ते ७ तास लागायचे. मात्र नवीन महामार्गामुळे हा वेळ दोन-अडीच तासांवर आला. चांगल्या दर्जाच्या रस्त्यांच्या सुविधा मिळवण्यासाठी टोल तर द्यावा लागेल, असे मतही गडकरी यांनी व्यक्त केले.

# साखरपुडा झाला, पैसे घेतले अन् लग्नाआधी नवरी गायब

**श्रीरामपुरात फसवणुकीचा गुन्हा दाखल**

**● श्रीरामपूर । वीरभूमी–**

श्रीरामपुरात बनावट नवरी उभी करून तरुण व त्याच्या कुटुंबीयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा प्रकार उघडकीस आला आहे. शांत कुलकर्णी (रा. लक्ष्मी नारायण नगर, गोळेगाव रोड, श्रीरामपूर) यांच्या तक्रारीवरून शहर पोलीस ठाण्यात दिली आगर येथील नापगूर व लातूर येथील सात जणांविरुद्ध रविवारी (दि. १६) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी शांत कुलकर्णी यांच्या भावाचे लग्न जुळवण्यासाठी स्थळाचा शोध सुरू होता. यावेळी पत्नीच्या माहेरच्या नातेवाईकांच्या माध्यमातून मध्यस्थीशी संपर्क झाला. त्यांनी लातूर येथील महिलेच्या माध्यमातून मुलीचे स्थळ असल्याचे सांगितले. मुलीचा फोटो पाहून स्थळ पसंत असल्याचे कळविल्यानंतर, नंतर १६ ऑगस्टला साकरपुड्यासाठी संबंधित मध्यस्थ महिला मुलीला घेऊन श्रीरामपुरात आली. कुलकर्णी यांना त्यांचा घरी नेणे, तेथे मुलगी, आई, भाऊ, मावशी आणि स्थळ दाखविणाऱ्या महिला यांची ओळख करून देण्यात आली. मुलगा व मुलीचा परिचय झाल्यानंतर त्याच दिवशी घरगुती पद्धतीने साखरपुडा झाला. दरम्यान मुलीच्या आजीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगून तातडीने उपचारासाठी पैशांची गरज असल्याचे सांगून नवरीच्या लोकांनी कुलकर्णी यांच्याकडे ६० हजार रुपयांची मागणी केली. विश्वासातून कुलकर्णी यांनी मध्यस्थीला ते ६० हजार रुपये रोख दिले. पैसे घेतल्यानंतर मध्यस्थ महिला लातूरला निघून गेली.

मुलगी कुलकर्णी यांच्या घरी राहिली. १८ ऑगस्टला जो मोबाईलवर संपर्क होऊ शकला नाही. मुलीनेही लग्न करण्यास नकार दिला. यानंतर कुलकर्णी यांना ६० हजार रुपये परत मागितले, मात्र उर्वरित १ लाख रुपये देण्यास लोक पसार झाले.

## SPOT NEWS

### आता यूजीसी-नेटच्या ३ विषयांची परीक्षा रद्द

**● नवी दिल्ली –** प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर त्रुटी आणि चुका आढळून आल्याने यूजीसी-नेटच्या ३ विषयांची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) आज घेतला. इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या ३ विषयांची परीक्षा रद्द करण्यात आली. आता या ३ विषयांची फेरपरीक्षा होणार असून, एनटीएने त्याचे वेळापत्रकही जाहीर केले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा एनटीएचा सावळागोंधळ चव्हाट्यावर आला आहे. परीक्षा रद्द करण्यात आलेल्या ३ विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर त्रुटी किंवा अनेक चुका आढळून आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर एका तज्ज्ञ समितीने केलेल्या शिफारशींनुसार अखेर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयाची फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने एक्सवर एक निवेदन प्रसिद्ध करीत या संदर्भातील माहिती दिली. यूजीसी नेटच्या विद्यार्थ्यांना आता या ३ विषयांची परीक्षा पुन्हा द्यावी लागणार आहे. यूजीसी नेटच्या ३ विषयांच्या फेरपरीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क विद्यार्थ्यांना द्यावे लागणार नाही. तसेच इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांच्या परीक्षा ९ आणि १० सप्टेंबर रोजी होतील, अशी माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने २२ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत देशभरात एकूण ८७ विषयांसाठी परीक्षा घेतल्या होत्या.

### गणेशमूर्तींच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ

**● मुंबई –** गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, देश-विदेशात गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पेणमध्ये यंदा गणेशमूर्तींच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतींबरोबरच आखाती देशांतील युद्धामुळे विस्कळीत झालेली पुरवठा साखळी, वाढलेला वाहतूक खर्च आणि जुलै महिन्यात पेण परिसरात आलेल्या महापुराचा मोठा फटका ही दरवाढीची प्रमुख कारणे आहेत. यावर्षी भोगावती आणि बाळगंगा नद्यांना आलेल्या महापुरामुळं पेणमधील अनेक मूर्तिकारांच्या कार्यशाळा आणि गोदामांमध्ये पाणी शिरले. तयार अवस्थेतील हजारो गणेशमूर्ती पाण्यात वाहून गेल्या, तर अनेक मूर्ती पूर्णपणे विरघळून निकामी झाल्या. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेकडो मूर्तिकारांना लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. त्यातच शाडू माती, प्लास्टर ऑफ पॅरिस, रंग, केमिकल्स, फायबर, लाकूड, पॅकिंग साहित्य आणि सजावटीच्या साहित्याच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे.

# आरटीओ अधिकाऱ्याच्या पतीवर हल्ला; पाथर्डीत सहा जणांवर गुन्हा दाखल

**पिस्तूल-चाकूचा धाक दाखवत सोन्याचे लॉकेट हिसकावले; कारवाईच्या रागातून धमकी व पैशांची मागणी केल्याचा आरोप**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

अहिल्यानगर येथील आरटीओ कार्यालयात नोकरीस असताना केलेल्या कारवाईचा राग मनात धरून आरटीओ अधिकाऱ्याच्या पतीवर हल्ला करून पिस्तूल व चाकूचा धाक दाखवत सोन्याचे लॉकेट हिसकावून नेल्याप्रकरणी सुधीर शिरसाठ, किसन आव्हाड, भाऊ आरगडे, बबलू कांबळे, राहुल सानप यांच्यासह ५ ते ६ अनोळखी व्यक्तींवर पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राहुल रामदास गर्जे यांच्या पत्नी सोनाली गर्जे या सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. सध्या त्यांची बदली यवतमाळ येथे झाली आहे. अहिल्यानगर येथे कार्यरत असताना मार्च २०२६ मध्ये बोधेगाव परिसरात विना क्रमांकाच्या ओव्हरलोड डंपरवर कारवाई करण्यात आली होती. हा डंपर सुधीर शिरसाठ याचा असल्याने कारवाई मागे घेण्यासाठी दबाव आणल्याचा, सोशल मीडियावर बदनामीकारक पोस्ट केल्याचा तसेच वेळोवेळी अडीच लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

दरम्यान, मे महिन्यात आरोपींनी शिरसाठवाडी रस्ता परिसरात गर्जे यांना अडवून शिवीगाळ केली. धारदार शस्त्राने दुखापत करून पिस्तूल दाखवत धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच कारेगाव येथील एका पेट्रोल पंपावर बोलावून दमदाटी व पैशांची मागणी केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

त्यानंतर १२ ऑगस्ट रोजी रात्री साडेबारा वाजता जॉगिंग पार्कसमोर दोन वाहनांनी गर्जे यांची कार अडवली. आरोपींनी चाकू व पिस्तूलाचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांचे सोन्याचे लॉकेट हिसकावून नेल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी राहुल गर्जे यांनी १४ ऑगस्ट रोजी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून खंडणी, जबरी चोरी, घातक शस्त्राने दुखापत, धमकी, बेकायदेशीर अडवणूक तसेच शस्त्र कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाथर्डी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# कोकीसपीर तांड्याच्या ग्रामपंचायतीत प्रथमच ध्वजारोहण

**संत सेवालाल महाराज ग्रामसमृद्धी योजनेतून स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत नव्याने स्थापन झालेल्या पाथर्डी तालुक्यातील कोकीसपीर तांडा ग्रामपंचायतीचे पहिले ध्वजारोहण पंचायत समितीचे माजी सदस्य विष्णुपंत पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

राज्यातील बंजारा-लमाण तांड्यांचा विकासाचा अनुशेष भरून काढून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा ग्रामसमृद्धी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ३०० लोकसंख्येच्या तांड्यांना महसुली गाव, तर ७०० लोकसंख्येच्या तांड्यांना ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याची घोषणा करण्यात आली होती.

या योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी ग्रामपंचायतीचे विभाजन होऊन कोकीसपीर तांड्याला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाला. या नव्या ग्रामपंचायतीचे पहिले ध्वजारोहण उत्साहात पार पडले.

यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तथा प्रशासक संजय गिऱ्हे, ग्राम अधिकारी सचिन दळवी, माणिकदौंडीचे माजी सरपंच शायद पठाण, माजी सरपंच संपतराव गायकवाड, सेवा संस्थेचे चेअरमन पोपटभाई पठाण, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब कांबळे, गोवर्धन राठोड नायक, शंकर महाराज यांच्यासह तांड्यातील ग्रामस्थ, महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

कोकीसपीर, वाघवाडी व सेवागड येथील जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक व विद्यार्थीही कार्यक्रमास उपस्थित होते. ग्रामपंचायतीला स्वतंत्र दर्जा मिळाल्याने तांड्याच्या विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.





# सन्मानाची नवी परंपरा : राज्यात १८३ ठिकाणी एकल महिलांच्या हस्ते ध्वजारोहण

**● अकोले । वीरभूमी–**

एकल महिलांना गावपातळीवर सन्मानाची वागणूक मिळावी, या उद्देशाने 'साऊ एकल महिला समिती'च्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त एकल महिलांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, विविध जिल्ह्यांत तब्बल १८३ ठिकाणी एकल महिलांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

एकल महिलांना सन्मान मिळत असल्याची बाब आश्वासक असून, त्यांना गावातील महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये सन्मानाने सहभागी करून घेणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. रूढी-परंपरांमुळे अनेकदा एकल महिलांना कौटुंबिक तसेच सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर ठेवले जाते. त्यांना या सामाजिक चौकटीतून बाहेर काढून गावातील महत्त्वाच्या कार्यक्रमात महत्त्वाचा सन्मान मिळावा, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यावर्षी अनेक गावांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

अकोले तालुक्यातील रुंभोडी येथे ग्रामपंचायतीमध्ये सरपंच रवी मालुंजकर यांनी पुढाकार घेत एकल महिला मंगल सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. यावेळी 'साऊ एकल महिला समिती'चे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी उपस्थित होते.

### जिल्हानिहाय ध्वजारोहण

■ सांगली १, अमरावती १, गडचिरोली १, परभणी २, हिंगोली १, गोंदिया १३, सातारा १३, वाशिम १८, धाराशिव १, अकोला ४, अहिल्यानगर १९, वर्धा ५, भंडारा ४, नंदुरबार ४, मुंबई ६, रायगड २, बीड १३, बुलढाणा १, सोलापूर १२, जालना २२, नांदेड ४, यवतमाळ ४, संभाजीनगर ६, धुळे ५, नाशिक १०, कोल्हापूर ३, नागपूर ४ आणि पुणे ४ ठिकाणी एकल महिलांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ही माहिती 'साऊ एकल महिला समिती'चे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी दिली.

# श्रीगोंदा तालुक्यात ६५ शिवपाणंद रस्ते खुले; १२५ किलोमीटर रस्त्यांची मोजणी पूर्ण

**३ सप्टेंबरला तालुकास्तरीय समितीचा दौरा । स्वयंस्फूर्तीने रस्ते खुले करणाऱ्या गावांना प्राधान्य**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

मुख्यमंत्री बळीराजा शेत- पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विधानसभा क्षेत्रीय समितीची बैठक शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय, श्रीगोंदा येथे समितीचे अध्यक्ष आ. विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत तालुक्यातील शिव- पाणंद रस्त्यांच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

बैठकीस तहसीलदार सचिन डोंगरे, पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, गटविकास अधिकारी राणी फराटे, शिव-पाणंद रस्ते राज्य समन्वयक दादासाहेब जंगले, क्षेत्रीय समिती सदस्य भीमराव लांडगे, जालिंदर कातोरे व काशिनाथ गायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी व समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्रीगोंदा तालुक्यात आतापर्यंत ६५ शिव- पाणंद रस्त्यांची मोजणी करण्यात आली असून, या रस्त्यांची एकूण अंदाजे लांबी १२५ किलोमीटर आहे. संबंधित रस्त्यांच्या हद्दी व खुणा निश्चित करण्याचे काम पूर्ण झाले आहे. आता या रस्त्यांची अंदाजपत्रके तयार करून प्रशासकीय मान्यतेसाठी उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर भाग, अहिल्यानगर यांच्याकडे पाठविण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले.

लोकसहभागातून शिव-पाणंद रस्ते खुले करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या संबंधित शेतकरी व ग्रामस्थांचे यावेळी अभिनंदन करण्यात आले. तसेच शिव- पाणंद रस्त्यांना अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध शासनाच्या निर्देशानुसार कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला.

महसूल व वनविभागाच्या शासन निर्णयानुसार, शिव- पाणंद रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीने ते स्वतःहून काढून न घेतल्यास तहसीलदारांमार्फत शासनस्तरावरून अतिक्रमण काढण्यात येणार आहे. तसेच इतर शेतकऱ्यांचा संबंधित रस्त्यावरून ये-जा करण्याचा हक्क मान्य करण्यात आला आहे. अशा रस्त्यांच्या जागेवर संबंधित शेतकऱ्यास पीक लागवड करता येणार नाही.

शिव- पाणंद रस्त्यांचे नुकसान करणाऱ्यांविरुद्धही कठोर कारवाई करण्यात येणार असून, अशा प्रकरणांमध्ये संबंधितांचे आधार कार्ड व फार्मर आयडी पाच वर्षांसाठी ब्लॉक करण्याची तसेच शासनाच्या विविध योजना आणि शासकीय मदतीपासून अपात्र ठरविण्याची तरतूद असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या अनुषंगाने तालुक्यात आतापर्यंत ६ प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.



### स्वयंस्फूर्तीने शिव-पाणंद रस्ते खुले करणाऱ्या गावांना कामांमध्ये प्राधान्य

■ स्वयंस्फूर्तीने शिव-पाणंद रस्ते खुले करणाऱ्या गावांना कामांमध्ये प्राधान्य दिले जाणार असल्याने, शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी पाणंद रस्त्यांवरील अडथळे दूर करून आपल्या गावातील रस्ते खुले करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी केले आहे.

### ३ सप्टेंबरला समितीचा तालुक्यात दौरा

■ तालुकास्तरीय समितीचा दौरा दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे. या दौऱ्यात श्रीगोंदा तालुक्यातील ज्या गावांमध्ये शिवपाणंद रस्ते लोकसहभागातून खुले करण्यात आले आहेत, त्या गावांना समिती भेट देणार आहे. खुले करण्यात आलेल्या शिवपाणंद रस्त्यांचे मजबुतीकरणाचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहे.

# SPOT NEWS



## पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात

● **पाथर्डी । वीरभूमी –**

येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाथर्डी (मुले व मुली) येथे देशभक्तीपूर्ण आणि उत्साहवर्धक वातावरणात स्वातंत्र्यदिन सोहळा साजरा करण्यात आला. शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीताने परिसर भारावून गेला. यावर्षी प्रथम संपूर्ण 'वंदे मातरम्' गीत सादर करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण, राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीत झाले. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आकर्षक संगीत कवायत व शिस्तबद्ध लेझीम प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. देशभक्तीपर भाषणे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कलागुणांचे प्रभावी सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचा परिसर देशभक्तीच्या रंगात रंगून गेला. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा तसेच शालेय व इतर उपक्रमांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक अशोकराव कराड, पत्रकार अनिल खाटेर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुशिला खाटेर, जयश्री काळोखे, माजी मुख्याध्यापिका रत्नप्रभा महांडुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका नंदा तुपे, मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक राजू गोल्हार, शिक्षिका शिला नागरे, अनुराधा तरवडे, भावना देवरे, ज्योती जाधव, सुरेखा बडे, मनिषा फटांगरे, मंदा पालवे, लता भंडारे, अर्चना खाडे, मंगल किर्तने व छाया चंदनशिव यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचे देशभक्तीपर सादरीकरण, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि शिस्तबद्ध कवायत-लेझीम यामुळे यंदाचा स्वातंत्र्यदिन सोहळा संस्मरणीय ठरला.

## अकोल्यात पी.बी. हांडे सोशल फाउंडेशनचा स्वातंत्र्यदिन सोहळा



● **अकोले । वीरभूमी –**

जादूगार पी.बी. हांडे सोशल फाउंडेशनच्या वतीने देशाचा ८०वा स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. वीरमाता अंजीना खरबस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते शांताराम गजे सर होते.संस्थाध्यक्ष जादूगार पी.बी. हांडे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण व अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्याची माहिती देत स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद केले. तसेच राष्ट्रीय सण आणि महामानवांच्या जयंती-पुण्यतिथीनिमित्त संस्थेतर्फे विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. कार्यक्रमातील कविसंमेलनात मंदाकिनी हांडे यांनी प्रबोधन गीत, तर देशमुख सर यांनी कविता सादर केली. अध्यक्षीय भाषणात शांताराम गजे यांनी सध्याच्या परिस्थितीत संस्थेचे कार्य प्रेरणादायी व कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. या सोहळ्यास ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब मंडलिक, मनोहर तळेकर, सुनील मंडलिक, डॉ. सुभाष आरोटे, खंडू मंडलिक, मेजर रामदास गोरडे, अण्णासाहेब आढाव, बी.टी. जोरवर, लोखंडे तात्या, निता साळवे, मेजर गभाले, भोसले सर, जालिंदर गायकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार संस्थेचे सचिव विकास आरोटे यांनी मानले. संचालक श्रीमती पुष्पाताई नाईकवाडी यांनी सूत्रसंचालन केले.

# जामगावच्या राजराजेश्वर मंदिरात १७४५ सालचा शिलालेख

### पोळ घराण्याच्या मंदिरनिर्मितीचा इतिहास उजेडात | ग्रामज्योतिषी केशव पोळ यांचे पुत्र राज व त्रिंबक यांनी धर्मार्थ शिवालय उभारल्याची नोंद

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील जामगाव येथील मध्यवस्तीत असलेल्या श्री राजराजेश्वर मंदिराच्या गाभारा प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला कोरलेला शिलालेख अठराव्या शतकातील स्थानिक धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासावर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकणारा ठरला आहे. या शिलालेखात पोळ उपनामाच्या घराण्यातील केशव यांचा 'ग्रामज्योतिषी' म्हणून उल्लेख असून, त्यांचे पुत्र राज आणि त्रिंबक यांनी धर्मार्थ राजराजेश्वर देवाचे शिवालय उभारल्याची नोंद आढळते.

हा शिलालेख उठाव स्वरूपाचा असून देवनागरी लिपीत मराठी-संस्कृत मिश्र भाषेत पाच ओळींमध्ये कोरलेला आहे. अनेक वर्षे उघड्यावर असल्याने वातावरणाचा परिणाम होऊन अक्षरे झिजली असून, मंदिरावर झालेल्या सततच्या रंगरंगोटीमुळे शिलालेखावरील मजकूर काही प्रमाणात झाकला गेला आहे. मात्र शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचता येत असल्याची माहिती संशोधकांनी दिली.

**शिलालेखाचे वाचन :**

**१.श्री गणेशाय नमो पोलोपनामा केशव तत्स्नु**

**२.ग्रामज्योतिषी ।। तत्सूनु राज नाम्ना जी**

**३.वे त्रिंबकावरेण च ।।१।। शके क्रोधनर्षि**

**४.षष्टषोडशवर्षशतेन भू श्रुचौ ।। इंदौ पंचम्यां**

**५.धर्मार्थमकारीत्सु शिवालयां ।।२।।**

शिलालेखाची सुरुवात 'श्री गणेशाय नमः' या मंगलाचरणाने होत असून, त्यानंतर पोळ उपनामाच्या घराण्यातील केशव यांचा ग्रामज्योतिषी म्हणून उल्लेख येतो. त्यांच्या पुत्रांचा म्हणजे राज आणि त्रिंबक यांचा उल्लेख पुढे करण्यात आला आहे. त्यामुळे त्या काळातील गावातील धार्मिक विधी, तिथी-वार, शुभमुहूर्त आणि कालगणना यामध्ये ग्रामज्योतिषीची असलेली भूमिका अधोरेखित होते.

शिलालेखातील नोंदीनुसार शालिवाहन शक १६६७, क्रोधन नाम संवत्सर, श्रावण शुद्ध पंचमी, इंदुवार अर्थात सोमवार या दिवशी धर्मार्थ शिवालयाची निर्मिती करण्यात आली. उपलब्ध कालगणनेनुसार हा कालखंड इ.स. १७४५ मध्ये येतो. त्यामुळे जामगाव येथील राजराजेश्वर मंदिराच्या इतिहासाला सुमारे पावणेतीनशे वर्षांपूर्वीचा लेखी पुरावा या शिलालेखामुळे प्राप्त होतो.



या शिलालेखाचे महत्त्व केवळ मंदिराच्या स्थापनेच्या तारखेपुरते मर्यादित नाही. मंदिरनिर्मिती ही त्या काळात धार्मिक पुण्यप्राप्ती आणि धर्माचरणाचे कार्य मानली जात होती, याचे स्पष्ट प्रतिबिंब 'धर्मार्थ' या उल्लेखातून दिसते. तसेच मंदिरनिर्मितीमध्ये केवळ राजे किंवा सत्ताधारी व्यक्तींचाच सहभाग नसून स्थानिक प्रतिष्ठित कुटुंबे आणि धार्मिक पदाधिकारीही पुढाकार घेत असल्याचे या लेखातून दिसून येते.

पोळ घराण्यातील केशव यांचा ग्रामज्योतिषी म्हणून झालेला उल्लेख तत्कालीन ग्रामीण समाजरचनेचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचा आहे. राज आणि त्रिंबक या पुढील पिढीतील व्यक्तींनी धार्मिक कार्यात सहभाग घेतल्याने कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा आणि मंदिरसंस्थेशी असलेला संबंधही स्पष्ट होतो. त्यामुळे हा शिलालेख स्थानिक कुटुंबपरंपरा, धार्मिक आश्रयव्यवस्था, सामाजिक जीवन आणि मंदिरसंस्थेच्या विकासाचा प्राथमिक ऐतिहासिक स्रोत ठरतो.

शक, संवत्सर, तिथी आणि वार यांची नोंद असल्यामुळे अठराव्या शतकातील कालगणना आणि धार्मिक दिननिश्चितीच्या पद्धतीचाही अभ्यास करता येतो. राजराजेश्वर देवाची प्रतिष्ठापना आणि शिवालयनिर्मितीचा संदर्भ मिळत असल्याने मंदिराच्या स्थापत्य इतिहासाच्या दृष्टीनेही या शिलालेखाला विशेष महत्त्व प्राप्त होते.

शिलालेखाचे वाचन पुणे येथील अनिल किसन दुधाणे आणि डॉ. शैलेंद्र भांडारे यांनी केले आहे. संशोधन व वाचन कार्यात डॉ. श्रीनंद बापट, भूषण पोळ, सवित्र पोळ आणि प्रसाद मेहर यांनी विशेष सहकार्य केले.

## दत्त मंदिरामुळे नव्या अध्यात्मिक पर्वाची सुरुवात : महंत रामगिरी महाराज



● **कोपरगाव । वीरभूमी–**

परमार्थामुळे संसारातील दुःख नष्ट होते. या ठिकाणी निर्माण होणाऱ्या भगवान दत्त मंदिरामुळे परिसरातील वातावरण भक्तिमय होणार असून एक संस्कारक्षम पिढी निर्माण होईल असे प्रतिपादन महंत रामगिरीजी महाराज यांनी केले आहे.

वैजापूर तालुक्यातील थोर वाघलगाव येथील आश्रमात दत्त मंदिराच्या नियोजित बांधकामाचे भूमिपूजन गोदाधामचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.

यावेळी रामगिरीजी महाराज यांनी विधिवत पूजन करून मंदिराच्या जागेचे भूमिपूजन केले. दत्त मंदिर हे परिसरातील भाविकांसाठी श्रद्धा व भक्तीचे केंद्र ठरणार असून, मंदिराच्या उभारणीमुळे परिसरातील गावांमध्ये धार्मिक व आध्यात्मिक वातावरणात भर पडणार आहे.

भूमिपूजन सोहळ्यास आमदार रमेश बोरणारे, संभाजीनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे, वैजापूरचे नगराध्यक्ष दिनेश परदेशी, जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे, मार्केट कमिटीचे चेअरमन कल्याण दांगोडे, स्वामी विश्वनाथ गिरी महाराज, मधुकर महाराज, रामभाऊ महाराज, संदीपान महाराज, ग्रामस्थ, भाविक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिराच्या उभारणीसाठी मोईन कुटुंबाच्या वतीने जागा देण्यात आली असून ग्रामस्थ व भाविकांनी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. भूमिपूजन सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## सोशल मीडियाचे छुपे आक्रमण अधिक घातक

### डॉ. पुरुषोत्तम भापकर | शेवगावात सुजन ग्रामगौरव सोहळा उत्साहात

● **शेवगाव । वीरभूमी –**



पूर्वी देशावर होणारी आक्रमणे उघड स्वरूपाची होती; मात्र आज सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारी छुपी आक्रमणे त्यापेक्षाही घातक आहेत. त्यामुळे नवीन पिढीची एकाग्रता व सर्जनशीलता धोक्यात आली आहे. पालक म्हणून याचा गांभीर्याने विचार केला नाही, तर मुलांमध्ये सुधारणा कशी होणार, याचा विचार करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मराठवाड्याचे माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी केले.

शेवगाव येथे सुजन ग्रामगौरव समितीच्या वतीने आयोजित सन्मान सोहळ्यात हस्तलिखित ज्ञानेश्वरी सिद्ध करणारे रमेश भारती व ती ग्रंथरूपात आणणारे छायाचित्रकार लक्ष्मण झिंजुर्के यांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानावरून डॉ. भापकर बोलत होते. यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार बैजू पाटील, उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, राम महाराज झिंजुर्के, प्रख्यात वक्ते दीपक कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ. भापकर म्हणाले, अध्यात्मिक पाया असेल तर आचरण शुद्ध राहते. सोळावे वर्ष हे क्रांतीचे वर्ष असते. याच वयात संत ज्ञानदेव व बाल शिवराय यांनी ऐतिहासिक कार्याचा संकल्प केला. आज हे सामर्थ्य पालक विसरले आहेत, त्यामुळे नवी पिढी बहकत आहे. यावर संतविचार हीच उपयुक्त मात्रा ठरेल.

छायाचित्रकार बैजू पाटील म्हणाले की, कलाकारांच्या नजरेतून पाहिलेले जग नितांत सुंदर असते, तर अध्यात्मिक सौंदर्य नेहमी अहिंसक असते. सुजन ग्रामगौरव समितीने या दोन्ही क्षेत्रांतील समर्पित व्यक्तींचा केलेला सन्मान अनुकरणीय आहे.

राम महाराज यांनी ज्ञानेश्वरीचे महत्त्व विशद करत 'एक तरी ओवी का अनुभवावी', याबाबत मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी समितीच्या कार्याचे कौतुक करून भविष्यात अशा विधायक उपक्रमांना बळ देण्याचे आश्वासन दिले.

सत्काराला उत्तर देताना रमेश भारती यांनी, हा आपला सत्कार नसून ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरीतील विचारांचा सत्कार आहे, असे सांगितले. लक्ष्मण झिंजुर्के यांनी गावाने केलेला सन्मान कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा असल्याचे सांगितले. विविध व्यक्ती व संस्थांच्या वतीने दोन्ही सत्कारमूर्तींचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे संयोजन अध्यक्ष दिलीप फलके, उपाध्यक्ष किसन माने, सदस्य कन्हैया सारडा व रामेश्वर जाजू यांनी केले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. समितीचे सचिव कचरदास सारडा यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन उमेश घेवरीकर यांनी केले, तर मिलिंद काटे यांनी आभार मानले.

## श्री समर्थ विद्यामंदिरात स्वातंत्र्य दिन उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा शाश्वत हॉस्पिटलचे संचालक डॉ. आकाश बेरड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व विविध कलाविष्कार सादर केले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. आकाश बेरड यांनी विद्यार्थ्यांनी एक रोल मॉडेल निवडून जिद्द, चिकाटी आणि सातत्याने ध्येय गाठावे, असे आवाहन केले.

# लायन्स समता ब्लड सेंटर'मुळे जिल्ह्यातील रुग्णांना मोठा आधार : राधाकृष्ण विखे पाटील

● **कोपरगाव । वीरभूमी –**

रक्ताची उपलब्धता ही रुग्ण सेवेतील अत्यंत महत्त्वाची बाब असून अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती तसेच गंभीर आजारांच्या उपचारांदरम्यान वेळेत रक्त उपलब्ध न झाल्यास रुग्णांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. ही गरज लक्षात घेऊन कोपरगाव शहरात उभारण्यात आलेले 'लायन्स समता ब्लड सेंटर' नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या रक्तपेढीच्या माध्यमातून कोपरगावसह अहिल्यानगर जिल्ह्यातील गरजू रुग्णांना शुद्ध व सुरक्षित रक्त उपलब्ध होईल, असा विश्वास राज्याचे जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.



लायन्स क्लब ऑफ कोपरगाव आणि समता चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने निवारा परिसरात सुरू करण्यात आलेल्या 'लायन्स समता ब्लड सेंटर'चा उद्घाटन सोहळा राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते आणि समता चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. नाशिक येथील समता ब्लड सेंटर आणि देवाज हेल्थ अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांचे या उपक्रमाला सहकार्य लाभणार आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना विखे पाटील म्हणाले की, समता परिवाराने कोपरगाव तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आपले सामाजिक दायित्व सातत्याने जपले आहे. आता या कार्याला लायन्स क्लबच्या सेवाभावी कार्याची जोड मिळाल्याने आरोग्य सेवेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुविधा निर्माण झाली आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जाते. मात्र रक्तदानाबरोबरच संकलित रक्त सुरक्षितपणे साठवणे, त्याची तपासणी करणे आणि गरजेच्या वेळी रुग्णाला उपलब्ध करून देणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. 'लायन्स समता ब्लड सेंटर' ही गरज प्रभावीपणे पूर्ण करेल आणि जिल्ह्यातील अनेक रुग्णांना त्याचा लाभ मिळेल.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना काका कोयटे म्हणाले की, समता चॅरिटेबल ट्रस्टच्या सामाजिक कार्याला लायन्स क्लबच्या सेवाभावी दृष्टिकोनाची जोड मिळाल्याने कोपरगावमध्ये आरोग्यसेवेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. समता परिवाराने यापूर्वी विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित करून नाशिक येथील समता ब्लड सेंटरला सुमारे ५ हजार रक्तपिशव्या उपलब्ध करून दिल्या आहेत. या माध्यमातून रक्तदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

स्थानिक गरज लक्षात घेऊन आता कोपरगावमध्येच रक्तसंकलन, रक्तसाठवणूक आणि गरजेनुसार रक्त उपलब्ध करून देण्याची सुविधा निर्माण झाली आहे. त्यामुळे तालुक्यातील रक्तदात्यांनी या सेवाभावी उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि नियमित रक्तदान करून गरजू रुग्णांच्या मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहनही काका कोयटे यांनी केले.

विधान परिषद सदस्य विवेक कोल्हे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, कोपरगाव शहराची आरोग्यविषयक गरज ओळखून अद्ययावत सुविधा असलेले रक्तकेंद्र उभारण्यात आले आहे. रक्ताच्या माध्यमातून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचे काम या केंद्रातून होणार असून सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन उभारलेला हा उपक्रम आदर्शवत आहे.

लायन्स इंटरनॅशनलचे डायरेक्टर एम.जे.एफ. ला. राज मुच्छाल यांनी लायन्स क्लब ऑफ कोपरगावच्या कार्याचे कौतुक केले. या क्लबच्या माध्यमातून सुरू झालेले हे रक्तकेंद्र देशातील ५२ वे लायन्स ब्लड सेंटर असल्याचे त्यांनी सांगितले. कोपरगावमधील हा उपक्रम इतर जिल्ह्यांतील लायन्स क्लबांसाठी प्रेरणादायी ठरेल. राष्ट्रीय पातळीवरून या रक्त केंद्राच्या माध्यमातून अधिक उत्कृष्ट सेवा देण्यासाठी आवश्यक सहकार्य व निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी आपण स्वीकारत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'लायन्स समता ब्लड सेंटर'मध्ये रक्त संकलन व साठवणुकीबरोबरच अत्याधुनिक मशिनरी आणि तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. रक्तावर आवश्यक प्रक्रिया करून त्यापासून विविध रक्त घटक तयार करण्याची सुविधा येथे उपलब्ध राहणार आहे. रक्तातील १८ प्रकारचे घटक तयार करण्याची सुविधा या केंद्रात असेल. त्यामुळे एका रक्तदानाचा उपयोग अधिक रुग्णांसाठी करता येणे शक्य होणार आहे.

या रक्त केंद्राची ४ हजार रक्त पिशव्या साठवून ठेवण्याची क्षमता असून दुर्मिळ रक्त गटही उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. रुग्णांना आवश्यकतेनुसार जागेवर रक्त उपलब्ध करून देण्याची सुविधा असल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांच्या नातेवाईकांची धावपळ कमी होण्यास मदत होणार आहे.

कोपरगाव परिसरातील गरजू रुग्णांसाठी दर महिन्याला ५० रक्त पिशव्या मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कार्यक्रमास कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान, गोदावरी खोरे दूध संघाचे चेअरमन राजेश परजणे, लायन्स डिस्ट्रिक्ट गव्हर्नर एम.जे.एफ. ला. श्रेयस दीक्षित, महानंदा दूध संघाचे संचालक राजेश जाधव, उद्योजक सम्राट वर्मा, अरविंद भन्साळी, कैलास ठोळे, चांगदेव कातकडे, समता पतसंस्थेचे व्हा.चेअरमन अरविंद पटेल, जेष्ठ संचालक जितुभाई शहा, नाशिक येथील समता ब्लड सेंटरचे प्रमुख डॉ. इरफान पठाण, लायन्स क्लबचे पदाधिकारी, समता चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शैलेश बनसोडे यांनी केले. उपस्थितांचे आभार लायन्स क्लब ऑफ कोपरगावचे नूतन अध्यक्ष सचिन भडकवाडे यांनी मानले.

## पाथर्डीत कमी दाबाच्या पाणीपुरवठ्याबाबत नगरसेविका दिपाली बंग यांचेकडून पालिकेला सुचना

### दुरुस्तीचे मुख्याधिकाऱ्यांचे आश्वासन | महिलांचा आंदोलनाचा इशारा

● **पाथर्डी । वीरभूमी –**



शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील कसबा भाग, बोडखे बाबा चौक, सुतार गल्ली तसेच काळभैरवनाथ देवस्थानच्या मागील परिसरात नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत टाकण्यात आलेल्या काही नळांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली होती. नागरिकांनी ही समस्या प्रभागाच्या नगरसेविका सौ. दिपाली रामनाथ बंग यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी पाथर्डी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तातडीने पाठपुरावा केला.

नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत मुख्याधिकारी संतोष लांडगे, पाणीपुरवठा विभागाचे हरिभाऊ पवार, योजनेचे राहुल काळे तसेच माजी नगरसेवक रामनाथ बंग यांनी संबंधित परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी नागरिक व महिलांशी चर्चा करून पाणीपुरवठ्यातील अडचणी जाणून घेण्यात आल्या.

पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुरुस्ती करूनही पाण्याचा दाब पूर्ववत झाला नाही, तर संबंधित ठिकाणी नवीन वॉल बसविण्यात येईल, असे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी परिसरातील महिलांना आश्वासन दिले.

दरम्यान, पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास नगरसेविका सौ. दिपाली बंग यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद कार्यालयात येऊन आंदोलन करण्याचा इशारा संतप्त महिलांनी दिला. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या पाहणीप्रसंगी भाऊसाहेब मर्दाने, दिलीप राऊत, अरुण राऊत, बजरंग गरड, रविंद्र मर्दाने यांच्यासह परिसरातील नागरिक, महिला व नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS




## धर्मवीरगडावर ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

राज्य पुरातत्व विभाग नाशिक व श्रीगोंदा तहसीलदार सचिन डोंगरे, नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या नियोजनातून किल्ले धर्मवीरगडावर ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. पेडगावचे ग्राममहसूल अधिकारी राहुल वडमारे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्याचे हे पाचवे वर्ष होते. यावेळी पेडगावचे सरपंच इरफान पीरजादे, युवराज शिंदे, अशोक गोधडे, गोरख खेडकर, संतोष बंदिस्ती, कैलास गवईकर, सादिक इनामदार, पुरातन विभागाचे कर्मचारी मच्छिंद पंडित, प्राथ.शिक्षक विजय लंके यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. शिवदुर्ग फाउंडेशनचे स्वयंसेवक अमोल बडे, सचिन भोसले, ईश्वर कोठारे, आविष्कार इंगळे, अनिकेत कोठारे यांनी सोहळ्याचे नियोजन केले. तत्पूर्वी एक दिवस अगोदर धर्मवीरगडावर झेंड्याभोवती श्रमदान करून वाढलेले गवत काढण्यात आले. शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या वतीने राज्य पुरातत्त्व विभाग नाशिक, केंद्रीय पुरातत्व विभाग अहिल्यानगर व तहसील कार्यालय श्रीगोंदा यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पाच वर्षांपासून हा गौरवशाली सोहळा आयोजित केला जात आहे.

## 'मॉडर्न'मध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात; वृक्षारोपणाने राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्धाटन



**अकोले । वीरभूमी–**

मॉडर्न हायस्कूल ज्युनिअर कॉलेजमध्ये दरवर्षीप्रमाणे स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत उपप्राचार्य दीपक जोंधळे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक दिलीप झोळेकर यांनी करून दिला. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी गणेश फरताळे (सेवानिवृत्त सुभेदार) व निलेश भुजबळ (आर्मी जी.डी.) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व विद्यालयातील कर्मचारी बाळासाहेब हारडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर रामदास वैद्य यांनी विद्यार्थ्यांना नशा व धूम्रपानविरोधी शपथ दिली. मिनानाथ खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी तसेच स्काऊट-गाईडच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना दिली. प्रमुख पाहुण्यांनी मनोगतात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व संघर्षाच्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर कार्यक्रम सादर केले. व्यासपीठावरील कार्यक्रमानंतर उच्च माध्यमिक विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य कार्यक्रम अधिकारी मनोहर भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख पाहुणे व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून योजनेचे अधिकृत उद्धाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास दिलीप शहा, बाळासाहेब वडजे, अमोल वैद्य यांच्यासह परिसरातील मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाच्या प्राचार्या जयश्री नन्नावरे व उपमुख्याध्यापक सुधीर जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश जोशी यांनी केले, तर पोपट उकिर्डे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कोपरगावात मोकाट जनावरांनी घेतला दुसरा बळी

### कोपरगावकरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांमध्ये पसरले भीतीचे वातावरण

**कोपरगाव । वीरभूमी –**

शहरात मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून, रस्त्यावर मुक्तपणे फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. यापूर्वी मोकाट जनावराच्या धडकेत एका निष्पाप व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतरही निष्काळजी प्रशासनाने परिस्थितीत अपेक्षित सुधारणा न केल्यामुळे काही दिवसांपूर्वी मोकाट जनावराच्या धडकेत जखमी झालेल्या आणखी एका व्यक्तीचा रविवार (दि.१६) रोजी उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने कोपरगावकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या सलग दोन दुर्दैवी घटनांमुळे कोपरगाव शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न केवळ वाहतुकीच्या अडथळ्यापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो थेट नागरिकांच्या सुरक्षेपर्यंत जाऊन पोहोचला असून नागरिकांचे कोपरगावच्या रस्त्यावर फिरणे मुश्किल झाले आहे. विशेषतः शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा, चौक आणि वर्दळीच्या भागात जनावरांचे कळप रस्त्यावर ठाण मांडून बसलेले किंवा घोळक्याने उभे असतात. त्यामुळे दुचाकीस्वार, पादचारी तसेच वाहन चालकांना या जनावरांना पार करून जाताना मोठी कसरत करावी लागत आहे.



नगरपालिका निवडणुकीपूर्वी वीरभूमीने प्रसिद्ध केलेले वृत्त.

मोकाट जनावरांमुळे सर्वाधिक धोका महिला, ज्येष्ठ नागरिक, शाळकरी विद्यार्थी आणि दुचाकीस्वारांना निर्माण झाला आहे. अचानक समोर आलेल्या जनावरामुळे वाहनाचा तोल जाणे, अपघात होणे किंवा जनावराने थेट धडक देणे अशा घटना घडण्याची शक्यता कायम आहे. परिणामी, सकाळ-संध्याकाळ घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी बाहेर पडतानाही सावधगिरी बाळगावी लागत असून यापुढे घराबाहेर पडायचे की नाही? असा प्रश्न पडला आहे.

एक घटना घडल्यानंतर देखील पालिका प्रशासनाने कोणत्याही प्रभावी उपाययोजना न केल्यामुळे पुन्हा एका निरपराध व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे कोपरगावकरांमध्ये नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात नाराजी वाढली आहे. मागील महिन्यात मोकाट जनावरांमुळे निष्पाप बळी गेल्यानंतर नागरिकांनी नगरपालिका प्रशासनाकडे मोकाट जनावरांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. मात्र कोपरगाव नगरपालिकेने या प्रश्नाकडे गांभीर्याने न पाहिल्यामुळे आणखी एका निरपराध व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला याला जबाबदार कोण? असा प्रश्न कोपरगावकर नगरपालिकेला विचारीत आहे.

## देशाची एकता-अखंडता टिकविणे प्रत्येकाची जबाबदारी

### अभय आव्हाड । विवेकानंद विद्यामंदिरात स्वातंत्र्यदिन उत्साहात

**पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील श्री विवेकानंद विद्यामंदिरात भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष व नगराध्यक्ष अभय आव्हाड म्हणाले, भारताची अखंडता, एकता व प्रगती टिकवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी व कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यलढ्यात देशभक्त व स्वातंत्र्यवीरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. त्यामुळे आज आपण स्वातंत्र्याचा आनंद घेत आहोत. देशाविषयी आदर व अभिमान बाळगणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यांनी विद्यार्थी व पालकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता चौथी, पाचवी, सातवी व आठवीच्या जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच पाथर्डी पंचायत समिती शिक्षण विभागाच्या बालचित्रकला स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देऊन गौरव करण्यात आला. इयत्ता दहावीतील प्रथम तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा वेंकटेश मल्टीस्टेट पतसंस्थेच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

विद्यालयातील २१२५ विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर सामूहिक कवायत संचलन सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याधिकारी संतोष लांडगे, उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड, विश्वस्त नंदकुमार शेळके, नगरसेवक बंडूशेठ बोरुडे, विश्वस्त इंजि. कुणाल आव्हाड, माजी मुख्याध्यापक रामनाथ फुंदे, मुख्याध्यापक शरद मेढे, पर्यवेक्षक संपत घारे, पालक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक ज्ञानेश्वर गायके यांनी केले, तर अनुजा कुलकर्णी यांनी आभार मानले.

## अमृतसागर दूध संघात ५० हजार लिटर मिल्क सायलोचे पिचड यांच्या हस्ते उद्घाटन

### दूध साठवण क्षमता वाढल्याने दूध उत्पादकांना दिलासा

**अकोले । वीरभूमी–**

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण २०२५-२६ अंतर्गत एकात्मिक दुग्ध विकास कार्यक्रमातून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून अमृतसागर दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले येथे ५० हजार लिटर क्षमतेच्या मिल्क सायलोचे उद्घाटन संघाचे चेअरमन माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या हस्ते करण्यात आले.

दुग्धशाळा, वाशेरे येथे १५ ऑगस्ट रोजी हा मिल्क सायलो बसवून कार्यान्वित करण्यात आला. त्यामुळे संघाची दूध साठवण व हाताळणी क्षमता वाढली आहे. दूध संकलन वाढत असताना मोठ्या प्रमाणात दूध साठविण्याचा प्रश्न या सुविधेमुळे सुटण्यास मदत होणार आहे.

यावेळी व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, संचालक गोरक्ष मालुंजकर, आनंद वाकचौरे, शरदराव चौधरी, आप्पासाहेब आवारी, रामदास आंबरे, जगन देशमुख, गंगाधर नाईकवाडी, अरुण गायकर, सुभाष डोंगरे, बाबुराव बेनके, शिवाजी गायकर, सौ. अश्विनी धुमाळ, सौ. सुलोचना औटी, तज्ज्ञ संचालक दयानंद वैद्य, बाळासाहेब मुंढे, कार्यकारी संचालक दादाभाऊ सावंत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी चेअरमन वैभवराव पिचड यांनी सांगितले की, या मिल्क सायलोबरोबर शासन व संघाच्या भागीदारीत १ हजार लिटर क्षमतेचे तीन बल्क मिल्क कुलर, २ हजार लिटर क्षमतेचे तीन बल्क मिल्क कुलर तसेच सात सचिव सयंत्र-सेट उपलब्ध झाले आहेत.

अमृतसागर दूध संघाने आठवडाभरापूर्वी दूध उत्पादकांना प्रतिलिटर ३९ रुपये दर दिला आहे. दूध दरवाढीमुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचा संघाकडे दूध देण्याकडे कल वाढला असून, त्या पार्श्वभूमीवर मिल्क सायलोमुळे दूध साठवणुकीची क्षमता वाढली आहे.

चेअरमन वैभवराव पिचड, व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, संचालक मंडळ व कार्यकारी संचालक दादाभाऊ सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतसागर दूध संघाच्या 'अगस्ती' पॅकिंग दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीत वाढ झाली आहे. मिल्क सायलो व बल्क मिल्क कुलरची भर पडल्याने दूध उत्पादक शेतकरी व सभासदांनी समाधान व्यक्त करून संघाचे अभिनंदन केले.

# शेवगाव शहरासह तालुक्यात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

### शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालयांत ध्वजारोहण; देशभक्तीपर कार्यक्रमांनी शहर दुमदुमले

**शेवगाव । वीरभूमी –**

देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन शेवगाव शहर व तालुक्यात उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शासकीय कार्यालये, शैक्षणिक व सामाजिक संस्था तसेच विविध आस्थापनांमध्ये राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी स्वातंत्र्यसैनिक, हुतात्मे आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना अभिवादन करण्यात आले.

शहरातील तहसील कार्यालयाच्या आवारात आमदार मोनिका राजळे व तहसीलदार आकाश दहाडदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. शेवगाव पोलीस ठाण्याच्या आवारात पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रवरा शैक्षणिक संकुलात मुख्य कार्यकारी अधिकारी पंजाबराव आहेर यांच्या हस्ते विविध प्राचार्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले. रेसिडेन्शियल हायस्कूलमध्ये ज्युनिअर कॉलेजचे समन्वयक संजय अकोलकर व प्राचार्य बालाजी गायकवाड यांच्या हस्ते, आबासाहेब काकडे विद्यालयात माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे व उद्योजक प्रकाश भंडारी यांच्या हस्ते, बाळासाहेब भारदे विद्यालयात संस्थेचे सचिव हरिश भारदे व प्राचार्य संजय कुलकर्णी यांच्या हस्ते, तर न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

शहरातील विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे, कवायती व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांमध्ये

> स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. देशाच्या विकासासाठी एकजुटीने काम करून राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.
>
> **– आ. मोनिका राजळे**

राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

स्वातंत्र्यदिनानिमित्त शहरात ठिकठिकाणी तिरंगा फडकताना दिसत होता. विद्यार्थी, शिक्षक, पालक, अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमांत सहभाग घेतल्याने संपूर्ण शेवगाव शहरात दिवसभर देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.



# नागपुरात भाजप नेते, कार्यकर्त्यांना रविंद्र चव्हाण यांच्या कडून कानपिचक्या

### आपण सोशल मीडियावर कमी पडतो, असा स्पष्ट आरोप! । आपण केंद्रात आणि राज्यात केलेली कामे सांगा : रविंद्र चव्हाण

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

नागपूर पदवीधर मतदारसंघातील विजयासाठी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील एकूण अंदाजे बारा लक्ष सुशिक्षित पदवीधर मतदारांपैकी किमान पन्नास हजार नवे मतदार नोंदणी करून घ्यावे आणि सोशल मीडियावर तसेच नागरिकांच्या प्रत्यक्ष गाठीभेटीत सक्रिय होत केंद्र तसेच राज्य सरकारने केलेल्या कामांचे प्रमोशन करावे अशा सूचना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेत्यांना दिल्या.

नागपुरात मंचावर राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, भाजप आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, परिणय फुके आणि शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी असताना या कानपिचक्या त्यांनी दिल्या आहेत. नागपूर पदवीधर मतदारसंघाची निवडणूक अवघ्या चार महिन्यांवर येऊन ठेपली असताना आतापासूनच भाजपने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्यावेळी प्रथमच भाजपला पराभवाचा सामना करावा लागला होता त्याची आठवण करून देत प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पूर्व विदर्भात दोन दिवसांत सहा बैठका घेतल्या.

नागपूरच्या एअरपोर्ट बँकवेट हॉल येथील आपल्या दौऱ्याच्या अंतिम बैठकीत नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि वर्धा येथील प्रमुख भाजप पदाधिकारी, नगरसेवक आणि नेत्यांच्या उपस्थितीत भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वात आधी आपल्याला ही निवडणूक जिंकायची आहे का? आपली तशी इच्छा आहे का? असा सवाल टाकत रवींद्र चव्हाण यांनी सर्व उपस्थितांची विकेट घेतली.डिजिटल प्लॅटफॉर्म वर आपल्यापैकी किती जणांची सक्रिय उपस्थिती असते असे पुढे सवाल करत त्यांनी सर्व उपस्थितांना अंतर्मुख केले.. आणि आपण सोशल मीडियावर कमी पडतो, असे सरळ स्पष्ट विधान करून कानपिचक्या दिल्या.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, नागपूर शहर, ग्रामीण आणि वर्धा मिळून सुमारे अंदाजे सत्तर लाख लोकसंख्या आहे. यापैकी सुशिक्षित पदवीधर अंदाजे १२ लाख असावेत असा अंदाज आहे. आपली राज्यात दीड लाखांपेक्षा जास्त सक्रिय सदस्य असलेली पार्टी आहे. इथल्या ८० टक्के लोकांनी डिजिटल प्लॅटफॉर्म वर सक्रिय असल्याचे सांगितले आहे.

पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्याचे मंत्री यांनी घेतलेले निर्णय पाहून त्यासाठी डिजाइन बनवून तुमचे नाव, तुमचे पद यांचा उल्लेख करून आपल्या पेजवर टाकत राहिलो आणि शेअर करत राहिलो तर महाराष्ट्रात एक चांगले वातावरण तयार करण्यात यशस्वी ठरू. आपल्यापैकी सोशल मिडिया क्षेत्रात तज्ज्ञ कोण आहे. त्याचे ऐकाल का. हे जर केलं तर त्याचे परिणाम लवकर दिसेल. केंद्र आणि राज्य सरकारची कामे जनतेपर्यंत पोहोचविणे, यावर भर दिला पाहिजे.

काही शक्ती अजेंडा घेऊन उतरतील. मग आपण काय करावं? तुमच्यापैकी नगरसेवक किती आहेत इथे. फक्त नगरसेवकच नाही, बाकी बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख आदी मुख्य कार्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे. आपण जेव्हा लोकांच्या भेटी घेतो. तेव्हा ते आपल्या समस्या सांगतात. त्या ऐकल्याच पाहिजे. पण त्याच वेळी आपण vocal झालो पाहिजे. आपली भाजप कार्यकर्ते म्हणून वेगळी ओळख आहे. आपण ठरवायचे की अशावेळी त्यांना काय सांगावे?

आपण राजकारणात कशासाठी आहोत. सत्तेसाठी नव्हे तर राष्ट्राचे हित साधण्यासाठी आहोत. गेल्या काही काळात आपण प्रत्येक निवडणुका जिंकत आहोत. आपला जाहीरनामा अजेंडा हा अटलजी पासून मोदीजी पर्यंत राष्ट्रहिताचाच तोच अजेंडा आहे. वेगळे काही नाही. राष्ट्राचे हित आणि विकास हाच अजेंडा. पश्चिम बंगालची निवडणूक जिंकल्याने देशाचे काय भले झाले ते आपल्याला सर्वांना माहित असून आपण बोलत नाही. ते आपण सांगितले पाहिजे. पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्याच दिवशी कॅबिनेट निर्णय झाला की घुसखोरी जिथून होते ती जागा केंद्राला देण्याचा निर्णय झाला. मोदींनी देशाच्या पुढील भविष्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक निर्णय घेतले आहेत.

आपण जर तिरंगा रॅली करत आहोत तर कशासाठी ते सांगितले पाहिजे. रशियाच्या अंतराळवीरांनी भारताचा तिरंगा दाखवून भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. का दिल्या, भारत त्या स्थितीत पोहोचला आहे. २०४७ चा विकसित भारत बनविण्यासाठी आपल्या मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा काय रोल ते सांगणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आधी दुष्काळ कसा होता. आपण काय करू शकलो. कागदावर असलेल्या योजना प्रत्यक्षात आणल्या. याला केंद्राचे असलेले योगदान काय. पुढच्या पिढीला दिशा देणाऱ्या या सर्व योजना आहेत. १४ तास लोडशेडींग होते. आज वन नेशन वन ग्रीड योजना राबवली गेली. विजेचा पुरवठा, विजेचे दर कमी करण्याच्या दिशेने प्रयत्न केले. उद्योग क्षेत्रात काय होत आहेत. GST वर बोललो पाहिजे. या सर्व गोष्टी लोकांपर्यंत चांगले सांगण्यास सुरुवात करा.

ज्या राष्ट्रीयत्वाच्या धाग्याने आपण सारे जोडले गेले आहोत, ज्या राष्ट्रीयत्वसाठी आपण राजकारणात आलो, ते आपले मूळ सामान्य लोकांपर्यंत अधिक प्रमाणात सांगायला सुरुवात करा, असे स्पष्ट निर्देश दिले.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
✻ संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# मोहटादेवी घाट रस्त्यावर संरक्षण कठड्यांचे काम सुरू

## नवरात्रोत्सवापूर्वी काम पूर्ण करण्याचे नियोजन । भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य



● **पाथर्डी । वीरभूमी**– राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानच्या नवीन घाट रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या कडेला संरक्षण कठडे बसविण्याच्या कामास सुरुवात झाली आहे. नवरात्रोत्सवापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याने भाविकांना अधिक सुरक्षित व सुविधाजनक प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या निधीतून सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून नवीन घाट रस्त्याचे काम सुरू आहे. ठेकेदार मे. बी. जी. मुरदारे यांच्याकडून रस्त्याचे, तर मे. जय माता दी कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत काँक्रिट रस्त्याचे काम करण्यात येत आहे. आमदार मोनिका राजळे यांच्या विशेष प्रयत्नातून या महत्त्वपूर्ण रस्ते विकासकामास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

दरम्यान, देवस्थान समितीच्या विश्वस्तांनी घाट रस्त्यावर सुरू असलेल्या संरक्षण कठड्यांच्या कामाची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. घाट रस्त्यावर भाविक व वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे संरक्षण कठड्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर अपघाताचा धोका कमी होऊन भाविकांच्या सुरक्षिततेत मोठी भर पडणार आहे.

या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल देवस्थानच्या विश्वस्तांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार मोनिका राजळे यांचे आभार मानले.

### उमा-महेश्वर मंदिरात श्रावणी सोमवारनिमित्त महाअभिषेक

■ मोहटादेवी मंदिराच्या दर्शनवृत्तात असलेल्या श्री उमा-महेश्वर देवालयात पहिला श्रावणी सोमवार व नागपंचमीनिमित्त धार्मिक विधी आणि महाअभिषेक उत्साहात पार पडला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. देवस्थान समितीचे विश्वस्त श्रीकांत लाहोटी, शशिकांत दहिफळे व अशोक दहिफळे यांच्या हस्ते महाअभिषेक व धार्मिक विधी करण्यात आले. आदिशक्ती मोहटादेवी व देवाधिदेव महादेवांच्या चरणी परिसरात चांगला पाऊस पडून पर्जन्यमान उत्तम राहावे, यासाठी प्रार्थना करण्यात आली.धार्मिक सोहळ्याचे पौरोहित्य वेदशास्त्रसंपन्न भूषण साखरे व बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे व जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांनी उपस्थित भाविक व मान्यवरांचे स्वागत केले.




## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात

● **पाथर्डी । वीरभूमी** – समाजात देशभक्तीची भावना वाढीस लागावी, या उद्देशाने १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगरच्या वतीने कमांडिंग ऑफिसर कर्नल निकेत नेगी यांच्या मार्गदर्शनाखाली ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात आले. बाबुजी आव्हाड महाविद्यालयात हे अभियान उत्साहात संपन्न झाले.

सात दिवसांच्या अभियानात विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये 'हर घर तिरंगा' पदयात्रा विशेष आकर्षण ठरली. नगरपालिका, बसस्थानक, कोरडगाव चौक, कसबा पेठ, अजिंठा चौक या मार्गावर पदयात्रा काढण्यात आली. बाबुजी आव्हाड महाविद्यालय व श्री तिलोक जैन विद्यालयातील एनसीसी छात्रांनी यात सहभाग घेतला. तसेच पाथर्डी शहरातील विविध शाळा-महाविद्यालयांनीही सहभाग नोंदवून देशभक्तीची भावना जागृत केली.

पदयात्रेत आमदार मोनिका राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, प्राचार्य डॉ. बबन चौरे, एनसीसी कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे, फर्स्ट ऑफिसर बाळासाहेब गांगुर्डे यांच्यासह विविध क्षेत्रांतील अधिकारी, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय', 'जय जवान, जय किसान' अशा घोषणांनी पाथर्डी शहर दुमदुमून गेले. दि. ९ ते १७ ऑगस्टदरम्यान महाविद्यालय परिसर प्लास्टिकमुक्त करून स्वच्छ करण्यात आला. एनसीसी छात्रांसाठी करिअर मार्गदर्शन व्याख्यान तसेच नशामुक्ती कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

# मांडेवाडी शाळेत ई-लर्निंगचा शुभारंभ

## सेवासहयोग फाउंडेशनच्या सहकार्याने स्मार्ट टीव्ही, सॉफ्टवेअर व संगणकांची सुविधा

● **अकोले । वीरभूमी** – स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून अकोले तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांडेवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. सेवासहयोग फाउंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने शाळेला स्मार्ट टीव्ही, सुंदरम शैक्षणिक सॉफ्टवेअर व दोन संगणक उपलब्ध झाल्याने ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक डिजिटल शिक्षणाची नवी दारे खुली झाली आहेत.



पारंपरिक शिक्षणासोबत आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून विद्यार्थ्यांना आनंददायी, कृतीशील व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. स्मार्ट टीव्ही व सुंदरम सॉफ्टवेअरच्या माध्यमातून अभ्यासक्रमातील विविध घटक चित्रे, ध्वनी, व्हिडिओ आणि डिजिटल शैक्षणिक साधनांच्या सहाय्याने सोप्या व रंजक पद्धतीने शिकविता येणार आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. ई-लर्निंगमुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासा, निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती, विचारक्षमता आणि विषय समजून घेण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार आहे.

सेवासहयोग फाउंडेशन, मुंबई येथील किशोर मोघे, दिपाली देवळे, राम रोकडे व विशाल देसाई यांच्या सहकार्यामुळे मांडेवाडी शाळेच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे. संस्थेने उपलब्ध करून दिलेला स्मार्ट टीव्ही, सुंदरम सॉफ्टवेअर व दोन संगणक अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत.

स्वातंत्र्यदिनानिमित्त सुरू झालेला हा ई-लर्निंग उपक्रम ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक ज्ञानाच्या विश्वाकडे टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे. या उपक्रमाबद्दल पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमींनी समाधान व्यक्त केले.

स्वातंत्र्यदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक ज्ञानदेव फापाळे यांनी केले, तर सूत्रसंचालन शिक्षक भाऊसाहेब कासार यांनी केले. कार्यक्रमास रामकृष्ण मांडे, विकास मांडे, वैभव रंधे, मीनानाथ ढोकरे, गोरक्ष ढोकरे, किरण बर्डे, संपत बर्डे, लहू शेळके, बाळू रंधे, विजय भोर, राजेंद्र बर्डे, प्रतीक्षा मांडे, रेश्मा ढोकरे, संदीप माळी, आशा बर्डे, दर्शना रंधे, रोहिणी बर्डे, गयाबाई रंधे आदी उपस्थित होते.

# मढीत कानिफनाथांचा प्रकट दिन उत्साहात

● **पाथर्डी । वीरभूमी**– श्रीक्षेत्र मढी येथे कानिफनाथांचा प्रकट दिन (जन्मोत्सव) हजारो भाविकांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. राज्यभरातून आलेल्या भाविकांनी सकाळपासूनच मोठी गर्दी केली होती. नाथांचे गीते, कीर्तन, भजन आदी विविध धार्मिक कार्यक्रमांनी मढी परिसर दुमदुमून गेला.



रविवारी सकाळी देवस्थान समिती व भाविकांच्या उपस्थितीत जन्मोत्सवाला प्रारंभ झाला. देवस्थानचे विश्वस्त मदन मरकड यांनी सपत्नीक कानिफनाथांच्या पादुकांची विधिवत महापूजा करून महाआरती केली. देवस्थान समितीचे अध्यक्ष विठ्ठल मरकड व कार्याध्यक्ष महादेव कोकाटे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर जन्माचा पाळणा गात महिला व नाथभक्तांच्या हस्ते पाळणा हलविण्यात आला.

फाल्गुन वद्य रंगपंचमीला चैतन्य कानिफनाथ महाराजांनी भगवान विष्णू व शिवशंकराच्या आदेशानुसार मढी येथे संजीवन समाधी घेतल्याची आख्यायिका आहे. गर्भागिरीचा संपूर्ण डोंगर नाथसंप्रदायाने व्यापलेला असून, याच डोंगररांगेत कानिफनाथ, गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथ, गहिनीनाथ व जालिंदरनाथ महाराजांच्या संजीवन समाध्या आहेत. रंगपंचमी, श्रावणी शुक्रवार, अमावस्या व पौर्णिमेला राज्याच्या कानाकोपऱ्यातून नाथभक्त दर्शनासाठी मढीत येतात.

चैतन्य कानिफनाथांनी श्रावण शुद्ध चतुर्थीला अवतार घेतल्याचे मानले जाते. त्यांच्या संजीवन समाधीस्थळी असलेल्या मढी येथील कानिफनाथ मंदिर तसेच सिद्धिविनायक सिद्धाश्रम येथे प्रकट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सिद्धाश्रम मढी येथे हभप संदीपान महाराज शिंदे (आळंदी) यांचे कीर्तन झाले. यावेळी नवनाथ ग्रंथातील अवतार प्रकट होण्याच्या अध्यायाचे वाचन करण्यात आले. जन्माचा पाळणा गात विविध मान्यवरांच्या हस्ते पाळणा हलविण्यात आला.

यावेळी अशोक महाराज मरकड, श्रीराम महाराज मचे, अनिल महाराज वाळके, माजी सरपंच भगवान मरकड, सेवा सोसायटीचे अध्यक्ष विष्णू मरकड, श्रद्धा मरकड, मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, उद्धव महाराज ढमाळ, कांता महाराज देवढे, विष्णू महाराज मरकड, बाबासाहेब मरकड, एकनाथ मरकड, उद्धव महाराज वाघमारे, साईनाथ महाराज कासार, सुदर्शन महाराज भोसले, हरिचंद्र मरकड, किरण मरकड, व्यवस्थापक संजय मरकड, भीमराज मरकड यांच्यासह मढी ग्रामस्थ व नाथभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नाशिक येथील नाथभक्त गोविंद बच्छाव यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# प्रमोद मंडलिक यांच्या मागणीनंतर प्रवरा नदी संवर्धन प्रस्तावाला केंद्राची सकारात्मक दिशा

## खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पाठपुराव्याला यश

● **अकोले । वीरभूमी** – अकोले नगरपंचायतीचे माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रमोद मंडलिक यांनी केलेल्या सातत्यपूर्ण मागणीची दखल घेत, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या विशेष प्रयत्नांतून अकोले परिसरातील प्रवरा नदी संवर्धनाच्या प्रस्तावाला केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

या महत्त्वपूर्ण प्रस्तावाचा सकारात्मक विचार केला जाईल. तसेच आयएफसी या सल्लागार संस्थेकडून प्रस्ताव दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, असे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी सांगितले.

या निर्णयामुळे अकोले परिसरातील नद्यांचे पुनरुज्जीवन, प्रदूषण नियंत्रण तसेच पाणी साठवण क्षमता वाढविण्याच्या कामांना मोठी गती मिळणार असल्याचे माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक यांनी सांगितले.

अकोले तालुक्यातील नदी प्रदूषणाचा प्रश्न आणि नदी संवर्धनाची गरज लक्षात घेऊन प्रमोद मंडलिक यांनी या मागणीचा नवी दिल्ली स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनीही केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाकडे या प्रस्तावाचे महत्त्व पटवून देत पाठपुरावा केला.

प्रवरा नदी संवर्धनाच्या प्रस्तावाला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल खासदार भाऊसाहेब वाकचौरे व माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त ज्ञानसागर क्लासेसकडून जवखेडे दुमाला शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

● **पाथर्डी । वीरभूमी** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवखेडे दुमाला येथे ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण व देशभक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सरपंच सौ. मंदाताई कसोटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कवायत, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण तसेच मनोगते व्यक्त करून उपस्थितांची दाद मिळवली.



स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ज्ञानसागर क्लासेसच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

यावेळी ज्ञानसागर क्लासेसच्या संचालिका जयश्री नेहुल म्हणाल्या, विद्यार्थ्यांना दिलेले शैक्षणिक साहित्य ही केवळ मदत नसून त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक वाटचालीला दिलेले बळ आहे. विद्यार्थ्यांची परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षणाच्या माध्यमातूनच त्यांचे आयुष्य घडू शकते. त्यामुळे ग्रामस्थांनी आपल्या परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करावी.

माजी प्राचार्य विक्रम नेहुल व माजी मुख्याध्यापक अरविंद काकडे यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांनी एकजुटीने योगदान देण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासह शाळेच्या भौतिक सुविधांना बळकटी देण्यासाठी जवखेडे दुमाला येथील ग्रामस्थांनी लोकसहभागातून शालेय इमारत दुरुस्तीसाठी ४२ हजार रुपये जमा केले. ग्रामस्थांच्या या योगदानाचे उपस्थितांनी कौतुक केले.

तालुक्यात ज्ञानसागरचे विद्यार्थी दरवर्षी उल्लेखनीय यश संपादन करून शिष्यवृत्ती, नवोदय विद्यालय तसेच सैनिक स्कूलसाठी पात्र ठरत आहेत. या शैक्षणिक कार्याबद्दल सौ. जयश्री नेहुल यांचा ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास सरपंच मंदाताई कसोटे, उपसरपंच भास्कर नेहुल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अविनाश नेहुल, सोसायटीचे चेअरमन संदीपराव नेहुल, व्हाईस चेअरमन प्रमोदराव काकडे, रामकिसन नेहुल, संभाजी गिरी, कर्पे मेजर, बाबासाहेब नेहुल, ताराचंद नेहुल, उद्धवराव नेहुल, अर्जुन नेहुल, सागर नेहुल, महेश नेहुल, अजितराव नेहुल, अंकुश नेहुल, दादासाहेब नेहुल, संपत कसोटे, रामतात्या नेहुल, विजय सोनवणे यांच्यासह अंगणवाडी सेविका, आशा सेविका, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम गाडेकर यांनी केले, तर मुख्याध्यापिका सौ. सिंधू बर्डे यांनी आभार मानले.

# अगस्ती कारखाना शेतकरी-कामगार केंद्रित चालवा : आ. डॉ. किरण लहामटे

## कर्जवाढ व आर्थिक स्थिती सभासदांसमोर मांडण्याची सूचना । अगस्ती सहकारी साखर कारखान्याची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

● **अकोले । वीरभूमी** – २०२२ च्या कारखाना निवडणुकीवेळी आपल्या मंडळाने कारखान्याचा दरवर्षी होणारा तोटा कमी करण्याचे आश्वासन सभासदांना दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता झाली पाहिजे. आपल्या कार्यकाळात कारखान्याचा तोटा किती कमी केला, याची माहिती वार्षिक अहवालाच्या माध्यमातून सभासदांसमोर मांडावी, अशी परखड सूचना देत आपल्याच नेतृत्वातील कारखान्याचे चेअरमन व संचालकांना आ. डॉ. किरण लहामटे यांनी चिमटा काढला. अगस्ती कारखाना शेतकरी व कामगारांना केंद्रस्थानी ठेवून चालवावा, असेही त्यांनी सांगितले.

अगस्ती सहकारी साखर कारखान्याची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन सीताराम पा. गायकर यांच्या अध्यक्षतेखाली कारखाना कार्यस्थळावर झाली. यावेळी आ. डॉ. लहामटे बोलत होते.

या वेळी व्हाईस चेअरमन सुनीताताई भांगरे, माजी आमदार वैभवराव पिचड, बी. जे. देशमुख, जालिंदर वाकचौरे, उत्कर्षाताई रुपवते, विजयराव वाकचौरे, ॲड. वसंतराव मनकर, राजेंद्र कूमकर, शरद चौधरी, प्रमोद मंडलिक, अनिल कोळपकर यांच्यासह संचालक परबतराव नाईकवाडी, रामनाथ वाकचौरे, अशोकराव आरोटे, अशोकराव देशमुख, विकासराव शेटे, मच्छिंद्र धुमाळ, कैलास शेळके, बाळासाहेब नाईकवाडी, पाटीलबा सावंत, मनोज देशमुख, प्रदीप हासे, सुधीर शेळके, बादशहा बोंबले, सीताराम वाकचौरे, सचिन दराडे, सुलोचना नवले, शांताबाई वाकचौरे, सदाशिव साबळे, विलासराव नवले, संदीपराव शेटे तसेच सहकार्यकारी संचालक सुधीर कापडणीस आदी उपस्थित होते.

आ. लहामटे म्हणाले की, अगस्ती कारखाना तालुक्याची भाग्यलक्ष्मी असून त्यावरच अकोल्याची बाजारपेठ अवलंबून आहे. शेतकरी व कामगारांचे संसार या कारखान्यावर चालतात. त्यामुळे ही भाग्यलक्ष्मी टिकली पाहिजे. कारखान्याला कर्ज कसे उपलब्ध करून द्यायचे, यासाठी आम्ही प्रयत्न करू; मात्र तालुक्यात उसाचे उत्पादन कसे वाढेल, याकडे कारखाना प्रशासनाने लक्ष द्यावे.



विरोधकांनी खोट्या अफवा पसरवल्यामुळे कारखान्याला ऊस कमी मिळाला, असे सांगण्यापेक्षा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांधावर जाऊन समजावून सांगणे गरजेचे होते. शासनाने एफआरपी निश्चित केलेले ऊस उत्पादन हे शेतकऱ्यांना चांगला व शाश्वत दर मिळवून देणारे उत्पादन असल्याने भविष्यात जास्तीत जास्त ऊस उत्पादनासाठी शेतकऱ्यांना हमी द्यावी. तसेच आपल्या कार्यकाळात कारखान्यावरील कर्ज किती वाढले आणि तोटा कमी करण्यासाठी कोणते प्रयत्न केले, याची माहिती सभासदांसमोर मांडावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

चेअरमन सीताराम गायकर म्हणाले की, कारखान्याचा हंगाम सुरू करण्यासाठी १४४ कोटी रुपयांचे अल्पमुदत कर्ज मिळाले होते. त्यातून ११८ कोटी रुपयांची थकबाकी व इतर कपात करून बँकेने २५ कोटी १८ लाख रुपये उपलब्ध करून दिले. त्यातून शेतकऱ्यांची देणी देण्यात आली. २०२६-२७चा गळीत हंगाम सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

ऊसतोड कामगारांना वेळेत ॲडव्हान्स न दिल्यास ते अन्य कारखान्यांकडे जाऊ शकतात. जिल्हा सहकारी बँकेवर प्रशासक असल्याने निर्माण झालेली अडचण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर जिल्हा बँकेने कर्ज उपलब्ध करून दिल्याने ऊसतोड मुकादमांना उचल देता आली. सभासदांसमोर कारखान्याची आर्थिक परिस्थिती मांडण्यासाठी सभा लवकर घेण्यात आली असून, सभासदांच्या सूचना घेऊन गळीत हंगाम सुरू केला जाईल, असे गायकर यांनी सांगितले.

### वार्षिक अहवालातील फोटोवरून वैभवराव पिचड यांचा टोला

■ माजी आमदार वैभवराव पिचड म्हणाले की, माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड यांचे अगस्ती कारखान्यावर खूप प्रेम होते. तालुक्याची कामधेनू असलेला कारखाना सुरू राहावा, यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. शेतकरी, कामगार व कारखान्याच्या हिताची त्यांनी शेवटपर्यंत काळजी घेतली. आज तोट्यात असलेल्या कारखान्याच्या वार्षिक अहवालात माझा फोटो नाही, याची मला बिलकुल खंत नाही; उलट समाधान आहे, असा उपरोधिक टोला त्यांनी लगावला. ऑडिटरने सुचविलेल्या दोष दुरुस्तीची नोंदही अहवालात अपेक्षित होती. सभासदांनी लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली सर्व संचालकांना २२-० अशा फरकाने निवडून दिले असून, कारखाना व्यवस्थित चालवावा हीच सभासदांची माफक अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

### दादासाहेब रुपवते यांच्या फोटोवरून आंदोलन

■ कारखान्याच्या वार्षिक अहवालात संस्थापक माजी मंत्री दादासाहेब रुपवते यांचा फोटो नसल्याने त्यांची नात उत्कर्षा रुपवते, आरपीआय नेते विजयराव वाकचौरे तसेच आरपीआय कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त केला. घोषणाबाजी करत कारखाना कार्यस्थळावरील कोनशिलेवर पुष्पहार अर्पण करून गांधीगिरी आंदोलन करण्यात आले. कारखान्याला दादासाहेब रुपवते यांची आठवण राहावी, यासाठी त्यांचा फोटोही भेट देण्यात आला.